Vol 6 Issue 2 March 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 2 | March - 2016

# भारतीय नृत्याचा इतिहास




Swarali Chandrakant Kulkarni
Tilak Maharashtra Vidyapeeth,Pune

**प्रस्तावना :**

आपल्या देशाला फार मोठा सांस्कृतिक वारसा आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या विविधतेतही एकता ही भारतीय परंपरा आहे. नृत्याद्वारेही एकता साधली जाते. संगीताद्वारे तालबध्द, लयबध्द शारिरिक हालचाल म्हणजे नृत्य होय. नृत्य ही एक अशी कला आहे की त्यामधून एखादी कथा, किंवा भावभावना व्यक्त होत असते.

स्वतःसाठी इतरांच्या मनोरंजनासाठी किंवा इतर अनेक कारणामागे नृत्य हा उद्येश असतो. नृत्य हे संभाषणाचे प्रभावी माध्यम असून नर्तक मूकपणे आपल्या नृत्याद्वारे आनंद, दुःख, असहाय्य, राग अशा भावना व्यक्त करीत असतो. अलीकडे मानसिक संतुलन सुधारण्यासाठी नृत्याचा उपचार केला जातो. यावरून त्याचे महत्व लक्षात येते.

**नृत्याचा इतिहास :** मानवाला विश्वाचे रहस्य उलगडायला सुरूवात झाल्यानंतर परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी नृत्याला सुरूवात झाली. नृत्य या सुंदर भारतीय कलेमागची हीच अध्यात्मिक प्रेरणा आहे. प्राचीन काळी देवताच नृत्य करत असत. आपल्याला माहिती असलेली नृत्यदेवता म्हणजे नटराज होय. नटराजाच्या हातातील डमरूतून ओम हा नाद निर्माण झाला आणि त्यातून वेगवगळया भावभावनांची उत्पत्ती झाली.

**नृत्याचा उगमः** भारतीय नृत्यकलेला प्राचीन वारसा आहे. ऋग्वेदातील वेचक ऋचा, यजुर्वेदातून मुद्रा, सामवेदातून गान आणि अथर्ववेदातून भाव मानून

ब्म्हदेवांनी पंचम वेदाची नाटयवेदाची निर्मिती केली. ब्म्हदेवांनी नाटयवेद भरतमुनींना ऐकविला. भरतमुनींनी हे सादरीकरण शंकरापुढे केले असता त्यांच्या आज्ञेवरून तांडूला तांडव शिकविले यातूनच पुढेही कला हळूहळू विश्वात पसरली, याशिवाय स्त्रियांकडूनही हा वारसा पुढे गेल्याचे दिसते, पार्वतीने लास्य हा नृत्य प्रकार बाणासुराची कन्या उषा हिला, उषेने द्वारकेच्या गोपिकांना व त्यांनी सौराष्ट्रातील जनतेला शिकविला इथूनच तो जगामध्ये पसरला.

**नृत्य प्रकार : प्रामुख्याने भारतीय नृत्याचे ३ प्रकार पडतात**
लोकनृत्य २. शास्त्रीय नृत्य ३. आधुनिक नृत्य

**लोकनृत्य :** काही लोकनृत्य हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भारतीय लोकनृत्य हे वैयक्तिक कलागुणांवर अवलंबून नसून ते देशातील वेगवेगळया सामूहिक परंपरा, रितीरिवाज यावर अवलंबून असतात. तसेच प्रत्येक समाजाचे परंपरा, गुणधर्म त्यात असतात. भारतीय लोकनृत्याचे ३ भागात वर्गीकरण केले जाते.

**सामूहिक नृत्य :** एखादा सण, समारंभ, उत्सव, धार्मिक विधी यावेळी हा नृत्य प्रकार साजरा केला जातो.

**आदिवासी नृत्य :** आदिवासींच्या प्राचीन पुजापध्दतींवर आधारित हा नृत्य प्रकार आहे. यातून आपणास आदिवासींचे पारंपारिक दर्शन घडते.

**लोकनृत्य :** वंशपरंपरागत काही व्यावसायिक व्यक्तींनी जतन केलेला त्याचा विकास करून वाढविला हा नृत्य प्रकार प्रामुख्याने जन्म,लग्न व इतर काही ठराविक समारंभाच्या प्रसंगी ग्रामीण भागामध्ये साजरा केला जातो.

**काही लोकप्रिय नृत्य खालीलप्रमाणे :**
घुमर नृत्य :राजस्थानमध्ये प्रसिध्द असलेला हा नृत्यप्रकार आहे. राजस्थानी मुली गाणी गात फेर धरत हे नृत्य करतात, होळी, वसंतोत्सव, दीपोत्सव अशा प्रसंगी खेडयातील कन्या रंगीबेरंगी पोशाख करून हातात पितळेच्या थाळीत पुजासाहित्य घेवून नाचत, वाजत देवळात जातात. गुणगुणत तल्लीन होत त्या देवळाबाहेर असा ताल धरतात की ते दृश्य खूप मनोहारी असते.

**पांगी नृत्य :** हिमाचल प्रदेशातील पर्वत रांगात हा नृत्य प्रकार प्रसिध्द आहे. या भागातील लोक आपला आनंद, प्रेम, काही विशीष्ट प्रसंगी या नृत्याद्वारे दाखवितात. स्त्री आणि पुरूष दोघेही एकमेकांच्या हातात हात घालून गोलाकार नाचत पूर्ण रात्र जागून रिंगण घालतात. नाचत नाचत ते दमतात आणि तेथेच आकाशाच्या छताखाली झोपी जातात.

**कैकोटिकली नृत्य :** फुलांचे वर्तुळ म्हणजे 'अरप्पु' हा त्या नृत्याचा आवश्यक भाग आहे. वर्तुळामध्ये निरनिराळया हावभांद्वारे, गाण्यांच्या सुरावर, तालबध्द लयाद्वारे ठेका धरून नाचतात. कोलकटम नावाच्या टिपया हातात घेवून हे नृत्य सुरू होते. वेगवगळे हातवारे करीत नाजूक हावभांवाद्वारे पायाचा ठेका धरणारे हे नृत्य पहाणायाला मंत्र मुग्ध करते.

**रास :** मणीपूर प्रांतातील हा नृत्यप्रकार आहे. राधाकृष्णाच्या काल्पनिक प्रेमावर आधारित हा नृत्यप्रकार आहे. या रास या प्रामुख्याने विशीष्ट स्थितीला केल्या जातात. उदा. वसंतरास हिवाळयातील पहिल्या पौर्णिमेला, कुंजरास दसयाला महारास, डिसेंबर मधील पौर्णिमेला साजरी केली जाते. कृष्णाच्या गोपिंवरोबरच मृदंगाच्या आधारे केला जाणारा हा रास प्रकार अवर्णनीय आहे.

१. गरबा आणि रास : गुजराथमधील प्रसिध्द नृत्य प्रकार आहे. अलीकडे हा रास प्रकार संपुर्ण भारतभर साजरा केला जातो.
२. कोळी नृत्य : हा नृत्य प्रकार कोळीबंधन करतात. हा अतिशय सुंदर असा नृत्यप्रकार आहे मासेमार हे दोन रांगामध्ये ओळीने उभे राहतात. त्यांच्या हातात वल्हे असते आणि ते होडी चालविल्याचे हावभाव करीत असतात. मागे पुढे हालचाली करून ते नाव समुद्रात चालवत असल्याची नाटयता निर्माण करतात. कोळी स्त्रियादेखील रांगेमध्ये ओळीने उभे राहून हातात हात गुंफून नृत्य करतात. नंतर स्त्री पुरूष एकत्रितपणे नृत्य करतात, आणि मासे पकडण्याची क्रिया नृत्याद्वारे दर्श विताता.
३. भांगडा नृत्य : जेव्हा गव्हाचे पीक दिसू लागते तेव्हा पंजावमध्ये हा नृत्य प्रकार केला जातो. पौर्णिमेच्या रात्री चंद्रकाशात ढोलकीच्या तालावर ग्रामीणवासी नृत्य करतात. दोन काठयांद्वारे ढोल वाजविणारा मध्यभागी असतो.

**भारतीय शास्त्रीय नृत्य**
१. भरतनाटयमः दक्षिण भारत तामिळनाडूतील तंजावर व कांचीपुरम हया भागात हा नृत्यप्रकाराचा उगम झाला. हा नृत्यप्रकार आलारिपु, जतीस्वरम, शब्दम, वर्णम, पदम आणि तिल्लाना या सहा नृत्यप्रकारातून होतो. या नृत्यात नृत्य आणि अभिनय यांचा सुंदर संगम दिसतो. भैरवी, कल्याणी, कंबोधी यासारंख्या रागांवर आधारित गाण्यांवर हा नृत्यप्रकार केला जातो. वाद्यवृंद संगीताच्या आधारे तालबध्द बोलातून गायक नृत्य पुढे पुढे नेत असतो.
२. ओडीसी : ओरिसा, जगन्नाथपुरी आणि भुवनेश्वर येथे हे नृत्य उगम पावले. इ. पू. सहाव्या, सातव्या शतकात जगन्नाथाच्या देवळातील दासी करत असत. वैशिष्टयपूर्ण लयबध्द हालचालीद्वारे हे नृत्य केले जाते. गुडघ्यामध्ये व कंबरेत बाक देवून नृत्य केले जाते. ओडीसी नर्तकी कमरेत विशीष्ट प्रकारे वाकून लयबध्द

वक्र हालचालीला त्रीभंगी आणि अशीच पण वर खाली हालचालीस अतिभंगी मुद्रा करतात . यानृत्यांमध्ये

१पात्र प्रवेश २ . भूमी प्रणाम ३ . विघ्नराज पूजा ४ . बध्द नृत्य ५ . इष्ट देवबंधन ६ स्वरपल्लवी या सर्वांचा समावेश असतो .

पल्लवी नृत्य हे भरतनाटयातील तिराणा सारखे शुध्द आहे . हे नृत्य प्रामुख्याने गीत गोविंदाच्या गायनावर आधारित असते .

**३ . कथ्थक :** उत्तर प्रदेश, राजस्थान, मथुरा वृंदावनचा परिसर हे या नृत्याचे उगमस्थान आहे, कथाकार कलाकरांनी या शैलीची सुरूवात केली . हा नृत्यप्रकार ब्रजरास म्हणूनही ओळखला जातो . लखनौ आणि जयपूर ही कथ्थकची दोन प्रमुख घराणी आहेत . (५) इ . स . दुसया शतकात या नृत्याचा उगम झाला .

गणेशवंदनाने या नृत्याची सुरूवात होते . अयन, संगीत, परग, तराणा, तालबध्द, पदन्यास आणि तिरकी चक्कर या क्रमाने हे नृत्य केले जाते . स्त्री पुरूष दोघेही हे नृत्य करतात .

श्रीकृष्णावर आधारित बिज, हिंदी, आणि उर्दु भाषेतील गीत यात असतात,ठुमरी,गझल, दादरा, कविता यांच्या संगीतावर हे नृत्य सादर केले जाते .

**कथ्थकली :** याचे उगमस्थान केरळ असून परंपरेवर आधारित देवळातून याचा विकास दुसया ते सोळाव्या शतकापर्यंत झाला . तांडव / मर्दानी / पुरूषप्रधान हालचाली हे याचे वैशिष्ट्य आहे कारण १२ वर्ष साधना केलेले पुरूष नर्तक हे नृत्य करतात . विविध रंगाची सौंदर्य प्रसाधने वापरून बनवलेला मुखवटा हे याचे वैशिष्ट्य होय . प्रत्येक मुखवटयाची अलंकारिक वेशभूषा असते . या नृत्यात डोळयातून भावप्रकटीकरणाचा अभिनय अत्यंत महत्वाचा असतो . आरंग केली, तोडायम्, पुराप्याड, मेलवप्पदन या चार टप्प्यांद्वारे नृत्याचे सादरीकरण केले जाते . विशीष्ट प्रकारचे चर्मवादय हे कथ्थकलीच्या सादरीकरणात अत्यंत महत्वाचे असते . पुराण, रामायण, महाभारतातील कथा यावर आधारित गीतांवर नृत्य केले जाते . कर्नाटक संगीत पध्दतीत ही गीते गायली जातात .

**४ . कुचीपुडी :** धार्मिक कल्पनांवर आधारित नृत्य नाटकातून याची सुरूवात आंध्रप्रदेश कृष्णा जिल्हा कुचीपुडी येथे झाली १४ व्या, १५ व्या शतकात स्वामी सिध्देन्द्र यांनी शैलीचा पुनरूध्दार केला सुरूवातीस पुरूष नर्तकच हे काम करित असत, परंतु १९३0 श्री . वेदांतम लक्ष्मीशास्त्री यांनी स्त्रियांना शिक्षण देवून सादरीकरणास सुरूवात केली इथूनच नृत्य नाटिकेबरोबरच वैयक्तिक नृत्य प्रकारही सुरु झाला . मडका, सात्विकाभिनय,नाटयप्रधान नृत्य रचना ही कुचिपुडीची ठळक वैशिष्ट्ये आहेत . भरतमुनींचे नाटयशास्त्र व नंदीकेश्वरांचे अभिनय दर्पण हे कुचिपुडीचे आधारग्रंथ आहेत . प्रत्येक कार्यक्रमाची सुरूवात रंग संप्रेक्षणम्, ध्वज वंदनम इ . विधी करून (६) सर्व देवतांची पूजा करूनच केली जाते . शब्दम्, जाती स्वरम्, जावळी,पदम्, त्यागराज,आश्रयाचर्य कीर्तने,दसू क्षेत्रेय,पदम या नृत्य प्रकाराबरोबरच कृष्णलीला तरंगीणीतील,तरंगम हे कुचीपुडीतील प्रमुख प्रकार आहेत . तेलगू व संस्कृत भाषेतील गीतांवर या रचना आधारित असतात .

**५ . मणिपुरी :** मणीपूर राज्यात १८ व्या शतकात याचा उगम झाला . हात शरीराजवळच ठेवून नाजूक व लवचिक हालचालीद्वारे हे नृत्य केले जाते कार्डबोर्डचे कडक अस्तर असलेला पायघोळ परकर छोटया छोटया टिकल्या व आरश्यांनी सुशोभित केलेला पोशाख करून सौम्य व नाजूक हावभावाद्वारे हे नृत्य केले जाते . कृष्ण, राधा, बलराम, गोपिका यांच्यावर रचलेली गीतेवर उत्तम हिंदुस्थानी संगीतावर हे नृत्य केले जाते .

**६ . मोहिनी अट्टम :**केरळ हे या नृत्याचे उगमस्थान आहे . पावले एकमेकांपासून काही अंतरावर ठेवून गुडघ्यात पाय वाकवून एका वैशिष्ट्यपूर्ण बैठकीत हा पदन्यास केला जातो . विशीष्ट बोलांवर मृदंगांच्या ठेक्यावर पदन्यास केला जातो .

## आधुनिक नृत्य

शास्त्रीय नृत्य किंवा लोकनृत्यातील बंधने शिथील करून, त्यात काही नवीन घालून या सर्वांच्या मिश्रनातून निर्माण होणाया हालचालींवर आधुनिक नृत्यात भर दिला जातो . आजच्या नृत्यावर पश्चिमी नृत्यांचा प्रचंड प्रभाव दिसतो .

भारतीय नृत्यकलेने परंपरा जोपासण्याचे महत्वपूर्ण कार्य केले . काळानुसार त्यात काही बदलही झाले या कलेने कलाकाराला प्रसिध्दी, वैभव, आनंद याबरोबरच उदात्त, सुसंस्कृत बनविले यामूळे भारतीय कलेचा अभ्यास करीत असताना नृत्यकलेचाही इतिहास माहित असणे गरजेचे आहे .

## संदर्भ साधने


१)A special issue on Dance - Hansya
२)Indian classical dance - kasila vatsnayan
३)नृत्य निवेदिता मुखर्जी
४)The Great cultural tradition -R. E. Tumev
५)Culture and Heritage of India - Basham A.L.
६) The History and culture of Indian people - Vol - १ ते ५
७) रंगमंच आणि नाटकीभूमिका, डॉ . लक्ष्मीकांत लाल .
८)भारत की छाप चायनिका शाह, कॉमेट प्रॉजेक्ट, वॉम्बे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org